# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 02 February 2025
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**
## **प्रादेशिक बातम्या**
## **दिनांक – ०२ फेब्रुवारी २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- यंदाचा अर्थसंकल्प तयार करताना प्रामाणिक करदात्यांना करामध्ये सवलत देण्याचं उद्दिष्ट होतं - अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची माहिती
- राज्यातल्या महानुभाव पंथाच्या सर्व प्रमुख श्रद्धास्थळांचा विकास करणार असल्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा
- देशभरात आज वसंत पंचमी उत्साहात साजरी, पंढरपुरात विठ्ठल-रुख्मीणीचा विवाह सोहळा

आणि

- १९ वर्षांखालील महिलांचा टी - ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक भारताने जिंकला, अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेवर नऊ खेळाडू राखून दणदणीत विजय

****

देशातल्या प्रामाणिक करदात्यांमुळे अर्थव्यवस्थेला मोलाचं योगदान मिळत असून, त्यांच्याकरता करांमध्ये सवलत देण्याचं उद्दिष्ट यंदाचा अर्थसंकल्प तयार करताना होतं, असं, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. २०२५-२६ या वर्षाचा अर्थसंकल्प काल संसदेत सादर झाल्याच्या पार्श्वभूमीवर वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत त्या बोलत होत्या. करआकारणी सुलभ आणि सोपी असावी, त्यामुळे करभरणा प्रामाणिकपणे करण्याला प्रोत्साहन मिळतं, भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत असून अमेरिकन डॉलर वगळता इतर परदेशी चलनांच्या तुलनेत भारतीय रुपयाची घसरण होत नाहीये, असं त्यांनी या मुलाखतीत स्पष्ट केलं.

****

राज्यातल्या महानुभाव पंथाच्या सर्व प्रमुख श्रद्धास्थळांचा विकास करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. नांदेड जिल्ह्यात हदगाव इथं महानुभाव पंथीयांचं श्रद्धास्थान असणाऱ्या श्री गुरुवर्य बापूनगर परिसरातल्या श्रीकृष्ण देव उखळाई मंदिराचा नवपर्व आणि कलशारोहण सोहळा आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पार पडला, त्यावेळी ते बोलत होते. रिद्धपुरचा पांचाळेश्वर, जाळीचा देव, गोविंद प्रभू देवस्थान या अनेक ठिकाणी संवर्धनाचं काम सुरु असून, यापुढेही हे कार्य सुरू राहील, असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिलं. या स्थळांच्या ठिकाणी असलेली अतिक्रमणं हटवण्यासाठी चर्चेतून मार्ग काढून विकास कामं केली जातील, चांगल्या कामांसाठी राज्य सरकार ताकदीने पाठिशी उभं राहील, असं ते म्हणाले. मराठवाडा, विदर्भासह ठिकठिकाणच्या महानुभाव पंथाच्या मठाधिपतींसह हजारोच्या संख्येने महानुभवपंथीय या सोहळ्याला उपस्थित होते.

****

जानेवारी २०२५ या महिन्यात एक लाख ९५ हजार कोटी रुपये वस्तू आणि सेवा कर महसूल जमा झाला आहे. जानेवारी २०२४ च्या तुलनेत या महिन्यात कर महसूलात १२ पूर्णांक तीन दशांश टक्के वाढ झाली आहे. या महिन्यात केंद्राचं वस्तू आणि सेवा कर संकलन ३६ हजार ७७ कोटी रुपये आणि राज्याचं वस्तू आणि सेवा कर संकलन ४४ हजार ९४२ कोटी रुपये इतकं आहे. एकात्मिक वस्तू आणि सेवा कर संकलन १ लाख कोटी रुपये तर उपकर संकलन १३ हजार ४१२ इतकं आहे.

****

दिल्ली विधानसभा निवडणुकीचा प्रचार उद्या संध्याकाळी संपणार आहे. भारतीय जनता पक्ष, आम आदमी पार्टी आणि काँग्रेस हे तीन प्रमुख पक्ष रिंगणात असून, मतदारांना आकर्षित करण्यासाठी जोमाने प्रचार करत आहेत. ७० सदस्यांच्या दिल्ली विधानसभेसाठी येत्या बुधवारी पाच तारखेला मतदान होणार आहे; तर आठ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होईल.

****

उत्तर प्रदेशात प्रयागराज इथं सुरु असलेल्या महाकुंभमेळ्यात येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षिततेसाठी विशिष्ट मार्गदर्शक तत्त्वे आणि नियमांची अंमलबजावणी करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात उद्या सोमवारी सुनावणी होणार

आहे. गेल्या बुधवारी झालेल्या चेंगराचेंगरीत किमान ३० जणांचा मृत्यू झाला आणि ६० जण जखमी झाल्याच्या पार्श्वभूमीवर ही याचिका दाखल करण्यात आली आहे. सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती संजय कुमार यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी होणार आहे. सर्व राज्यांना प्रयागराज इथल्या सुरक्षिततेची माहिती देण्यासाठी आणि आपत्कालिन परिस्थितीत त्या-त्या राज्यातल्या रहीवाशांना मदत करण्यासाठी सुविधा केंद्र स्थापन करण्याची मागणी या याचिकेत करण्यात आली आहे.

****

देशभरात आज वसंत पंचमी साजरी होत आहे. या दिवशी विद्येची देवता सरस्वतीची पूजा केली जाते, तसंच वसंत ऋतूचं स्वागत करून निसर्गातील नवनिर्मितीचा उत्सव साजरा केला जातो.

शिक्षण आणि ज्ञानाचं महत्व सांगणारा तसंच समृद्धी आणि आनंदाचा उत्सव साजरा करणारा हा दिवस असून, सर्व देशवासियांना शुभेच्छा देत असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. लवकरच भारत जागतिक स्तरावर ज्ञानाचं केंद्र म्हणून उदयाला येवो, अशी प्रार्थना त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही देशवासियांना वसंतपंचमीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

****

पंढरपुरात आज वसंत पंचमीच्या मुहूर्तावर विठ्ठल-रुख्मीणीचा विवाह सोहळा झाला. यावेळी रुख्मिणीला शुभ्र वस्त्र, मोत्याचे दागिने, अलंकार परिधान करण्यात आले होते. विविध अलंकारांनी नटलेल्या मूर्ती विठ्ठल आणि रखुमाईच्या शाही मंडपात आणण्यात आल्या, तिथं भाविकांच्या उपस्थितीत मंगलाष्टकांच्या घोषात दोन्ही देवतांचं लग्न लागलं. सोहळ्यानंतर सर्व भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

****

सांस्कृतिक मंत्रालयानं आकाशवाणीच्या सहकार्यानं आज नवी दिल्लीतल्या आकाशवाणी भवन इथं 'हर कंठ में भारत' हा संगीताचा विशेष कार्यक्रम सुरू केला. हा कार्यक्रम आजपासून १६ फेब्रुवारीपर्यंत दररोज २१ आकाशवाणी केंद्रांवरून सकाळी साडेनऊ ते साडेदहा पर्यंत थेट प्रक्षेपित केला जाईल. सांस्कृतिक मंत्रालयाचे सचिव अरुणिश चावला आणि प्रसार भारतीचे मुख्य कार्यकारी

अधिकारी गौरव द्विवेदी यांनी या कार्यक्रमाचं उद्घाटन केलं. आकाशवाणीच्या महासंचालक डॉ. प्रज्ञा पालीवाल गौर याही यावेळी उपस्थित होत्या.

****

१९ वर्षांखालील महिलांचा टी – ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक भारताने जिंकला आहे. आज झालेल्या अंतिम सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेवर नऊ खेळाडू राखून दणदणीत विजय मिळवला. दक्षिण आफ्रिकेचं ८३ धावांचं आव्हान भारतानं एका बळीच्या बदल्यात बाराव्या षटकात पूर्ण केलं. भारताची फलंदाज गोंगदी त्रिशा हिने नाबाद ४४ तर सानिका चाळकेनं नाबाद २६ धावांची खेळी करत विजयावर शिक्कामोर्तब केलं. त्याआधी प्रथम फलंदाजीसाठी आलेला दक्षिण आफ्रिकेचा संघ अवघ्या ८२ धावाच करु शकला. भारताच्या गोंगदी त्रिशानं तीन, पारुनिका सिसोदिया, आयुषी शुक्ला आणि वैष्णवी शर्मा यांनी प्रत्येकी दोन, तर शबनम शकिल हिनं एक खेळाडू बाद केला. गोंगदी त्रिशा हिला सामना वीर आणि मालिका वीर म्हणून गौरवण्यात आलं.

****

पुरुष क्रिकेटमध्ये, भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या टी-20 क्रिकेट मालिकेतला पाचवा आणि शेवटचा सामना आज मुंबईत खेळला जाणार आहे. संध्याकाळी सात वाजता या सामन्याला सुरुवात होईल. या मालिकेत भारताने तीन – एक अशी विजयी आघाडी घेतली आहे. टी-20 मालिकेनंतर दोन्ही संघांमध्ये तीन एकदिवसीय सामने होणार आहेत.

****

उत्तराखंडमधे सुरु असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्र १२ सुवर्ण पदकांसह तिसऱ्या स्थानावर आहे. भारोत्तोलन स्पर्धेत पुरुषांच्या १०२ किलो वजनी गटात आज महाराष्ट्राच्या वैशव शहाजी ठाकूर याने सुवर्ण पदक पटकावलं. या स्पर्धेत आज महिलांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशन प्रकारात मध्य प्रदेशच्या आशी चौकसी ने सुवर्ण पदक जिंकलं. या विजयासोबतच तीने राष्ट्रीय विक्रम देखील केला आहे.

पदक तालिकेत सेनादलांचा संघ सर्वाधिक १४ सुवर्णपदकं मिळवून अव्वल स्थानावर, तर कर्नाटक १३ सुवर्णपदकांसह दुसऱ्या स्थानावर आहे.

****

आजच्या जागतिक पाणथळ दिनानिमित्त नवी मुंबई महानगरपालिका आणि इन्व्हायरमेंट लाईफ आणि सेव्ह नवी मुंबई या दोन पर्यावरण क्षेत्रात कार्यरत सेवाभावी संस्थांच्या सहयोगाने बेलापूर विभागात सागरी किनारा तसंच सीवूड्स इथं विशेष स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. यावेळी प्लास्टिक बंदी आणि माझी वसुंधरा अभियानाअंतर्गत सामुहिक शपथ घेण्यात आली, तसंच कापडी पिशव्यांचं वाटप करण्यात आलं. या मोहिमेअंतर्गत पाणथळ जागांमधून मोठ्या प्रमाणात कचरा काढून टाकण्यात आला.

****

नाशिकजवळ सिन्नर इथं झालेल्या इनोव्हा आणि डंपर च्या अपघातात इनोव्हातल्या तीन प्रवाशांचा मृत्यू झाला असून, एक जण गंभीर जखमी आहे. रत्नागिरीचे रहिवासी असलेले हे प्रवासी कुंभमेळ्यात अमृतस्नान करून परत येत असताना सिन्नरजवळ त्यांच्या गाडीला समोरून येणाऱ्या डंपरने धडक दिली. महामार्गावर प्रवास करणाऱ्या इतर वाहनचालकांनी थांबून त्यांना मदत केल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आणि सुविधांसाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने रेल्वे सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा हे उद्यापासून तीन दिवस पुणे विभागातल्या विविध रेल्वे स्थानकांची तपासणी करणार आहेत. यात ते बीड रेल्वे स्थानक आणि तिथल्या सुविधांची देखील पाहणी करणार आहेत. यामध्ये विगनवाडी ते राजुरी, राजुरी ते बीड स्थानकांदरम्यानची तपासणी होणार आहे.

****

नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा प्रशासन, यांच्या संयुक्त विद्यमाने किनवट इथं येत्या आठ फेब्रुवारीला शासकीय सेवा आणि योजनांचं महाशिबीर आयोजित करण्यात आलं आहे. शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती आणि योजनांचा प्रत्यक्ष लाभ गरजुंना मिळावा, तसंच तळागाळातील व्यक्ती सुध्दा या योजनांपासून वंचित राहू नये यासाठी जनजागृती होण्यासाठी हे महाशिबीर होत आहे.

****

मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी एका प्रवाशाकडून काल एक किलो ६४९ ग्रॅम वजनाचे अंमली पदार्थ जप्त केले. त्याचं आंतरराष्ट्रीय बाजार पेठेतलं मूल्य अंदाजे १६ कोटी ४९ लाख रुपये इतकं आहे. पॅरिसमार्गे मुंबईला आलेल्या प्रवाशाकडून पांढऱ्या रंगाच्या १७० कॅप्सूल जप्त करण्यात आल्या, असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****